स्थायी समितीच्या **सोमवार दिनांक 03–10–2016** रोजी दुपारी **03–00** वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिति सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## उपस्थित सभासद

| अ.क्र. | मा. सदस्य/सदस्यांचे नांव | पद |
|---|---|---|
| **1.** | मा. श्री. बंडू उर्फ सुधीर राऊत | सभापती |
| **2.** | मा. श्री. जगतराम सेवकराम सिन्हा | सदस्य |
| **3.** | मा. श्री. राजू भाऊराव नागूलवार | सदस्य |
| **4.** | मा. श्री. किशोर चिंधुजी गजभिये | सदस्य |
| **5.** | मा. श्री. जगदीश ग्वालबंशी | सदस्य |
| **6.** | मा. श्रीमती संगीता कळमकर | सदस्या |
| **7.** | मा. श्री. रामदास गुडधे | सदस्य |
| **8.** | मा. श्री. संजय महाकाळकर | सदस्य |
| **9.** | मा. श्री. सुरेश जग्यासी | सदस्य |
| **10.** | मा. श्रीमती कुमूदिनी कैकाडे | सदस्या |
| **11.** | मा. श्रीमती इफ्तीखर अशरफू | सदस्या |
| **12.** | मा. सौ. दिव्या धुरडे | सदस्या |
| **13.** | मा. श्री. गणेश उर्फ मुन्ना पोकूलवार | सदस्य |
| **14.** | मा. सौ. अश्विनी जिचकार | सदस्या |
| **15.** | मा. श्री. अनिल धावडे | सदस्य |
| **16.** | मा. सौ. सरिता तिवारी | सदस्या |

## उपस्थित अधिकारी

1. श्री. रविन्द्र कुंभारे, अति. आयुक्त
2. श्री. हरीश दुबे, निगम सचिव

ठराव क्रमांक 555ः–
{बाजार विभाग}

शासन निर्णय क्र. राफेधो – 2013/प्र.क्र.39/नवि 34 दि. 21 ऑक्टोबर 2013 अन्वये व मा. सर्वोच्च न्यायालयाचे दि. 13 सप्टेंबर 2013 चे आदेशानुसार नागपूर महानगरपालिका सीमा अंतर्गत क्षेत्रातील आदर्श उपविधीतील व्याख्यानुसार असणा–या फेरीवाल्यांचे सर्वेक्षण तथा नोंदणीकरण करण्याची कार्यवाही पुर्ण करावयाची असल्यामुळे प्रत्यक्ष मौकास्थळी जावुन मौक्यावरच मौक्याचे छायाचित्र, फेरीवाल्याचे छायाचित्र व दस्ताऐवत प्राप्त करून घेवुन संगणकात सर्व Record ची साठवण करून संबंधितांना लगेच नोंदणकृत ID Card, Registration Plates, Certificate पुरविण्याचे काम अपेक्षित आहे. ई–निविदा प्रक्रिया राबवुन M/s Vidarbha Enfotech Pvt., Ltd., Nagpur

यांना या कामाचे कंत्राट देण्यात आलेला आहे. व यास स्थायी समिती ठराव क्र. 279 दि. 28/11/2014 अन्वये मंजुरी प्राप्त आहे.

मे. विदर्भ इंन्फोटेक प्रा. लि. रामदासपेठ, नागपूर या एजन्सीला कार्यालयीन आदेश जावक क्र. 393/एम.एस. दि. 08/12/2014 रोजी नागपूर महानगरपालिकेच्या बाजार विभागातील झोन क्र. 1 ते 10 अंतर्गत फेरीवाल्यांचे सर्वेक्षण व नोंदणीचे कामाकरीता कार्यादेश देण्यात आलेला होता. त्याचप्रमाणे सदरचे कामाकरीता दि. 20/08/2015 रोजी करारनामा करण्यात आलेला होता. मे. विदर्भ इंन्फोटेक प्रा. लि. रामदासपेठ, नागपूर या एजन्सीच्या प्रतिनिधीनी महानगरपालिकेच्या झोन क्र. 1 ते 10 अंतर्गत आजापर्यंत 35980 हॉकर्सचे सर्व्हेक्षण करण्यात आलेले असुन, यापैकी 3480 हॉकर्सची झोन क्र. 1 ते 10 अंतर्गत नोंदणी करण्यात आलेली आहे. अजुनही ब–याच प्रमाणात झोन क्र. 1 ते 10 अंतर्गत हॉकर्सची नोंदणी करावयाची आहे. परंतु शहरातील हॉकर्स कडुन त्यांचे नोंदणी करून घेणे हेतु पाहीजे त्याप्रमाणात उत्स्फुर्त प्रतिसाद एजन्सीच्या प्रतिनिधींना प्राप्त होत नाही आहे. तसेच मे. विदर्भ इंन्फोटेक प्रा. लि. रामदासपेठ, नागपूर या एजन्सी सोबत झालेल्या करारनाम्याप्रमाणे त्यांचा कार्यकाळ दि. 19/08/2016 रोजी संपुष्टात आलेला आहे.

नागपूर शहर सीमे अंतर्गत अजुनही ब–याच प्रमाणात हॉकर्सचे सर्व्हेक्षण तथा झोन क्र. 1 ते 10 अंतर्गत हॉकर्स नोंदणीचे काम बाकी असल्यामुळे हॉकर्सचे उर्वरीत काम मे. विदर्भ इंन्फोटेक प्रा. लि. रामदासपेठ, नागपूर या एजन्सीला शहर सीमे अंतर्गत हॉकर्स नोंदणी तथा नविन हॉकर्सचे सर्व्हेक्षण करण्याकरीता दि. 31 मार्च 2017 पर्यंत मुदत वाढ देवुन हॉकर्स बद्दलचे काम करण्याकरीता कालावधी वाढविण्याबाबतचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 556</u>:– पर्यावरण स्थितीदर्शक अहवाल वर्ष 2015–16 च्या
{वाहतूक विभाग} खर्चास कार्योत्तर मंजुरी प्रदान करणे.

महाराष्ट्र एन्वायरो पावर लिमीटेड यांचे कडून प्राप्त व उपलब्ध पर्यावरण माहितीचे आधारे केंन्द्र शासन पुरस्कृत निरी संस्थे मार्फत वर्ष 2015–2016 चा पर्यावरण स्थिती दर्शक अहवाल तयार करण्याच्या मा. आयुक्त यांचे द्वारे देण्यात आलेल्या मंजुरी दिनांक 15.03.2016 च्या अनुषंगाने कार्यकारी अभियंता (वाहतुक) यांचे द्वारे देण्यात आलेल्या कार्यादेश क्र. 102/E दिनांक 15.04.2016 च्या रु. 15.00 लक्ष अधिक सेवा कर रु. 2.25 लक्ष एकूण रु. 17.25 लक्ष खर्चास आय व्यय पद क्र. (692) A 22501530821 अंतर्गंत कार्योत्तर मंजूरी देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 557</u>:– पर्यावरण स्थितीदर्शक अहवाल वर्ष 2016–17 ते
{वाहतूक विभाग} 2020–21 पर्यंत एकूण 5 वर्षाकरिता तयार करण्याच्या खर्चास मंजुरी प्रदान करणे.

पर्यावरण स्थितीदर्शक अहवाल वर्ष 2016–17 ते 2020–21 पर्यंत (एकूण 5 वर्षाकरिता) केंद्र शासकीय संस्था निरी मार्फत करुन घेण्याकरिता त्यांचेकडून दिनांक 18. 07.2016 रोजी प्राप्त सहमती पत्रासह पर्यावरण अहवाल पार्ट ब च्या वित्तीय प्रस्तावाप्रमाणे संस्थेस क्रिया 1 ते 3 करिता दिलेल्या रु. 110 लक्ष अधिक त्यावर 15.00 टक्के (रु. 16.50 लक्ष) सेवा कर जोडून एकुण खर्च रु. 126.50 लक्षास आय व्यय पद क्र. A2 25 015 308 21 **(692)** अंतर्गंत मंजुरी देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन,

क्रिया 1 :– मनपा कक्ष स्थापन करणे (याकरिता मनपा खर्च व कर्मचारी उपलब्ध करुन देईल)

क्रिया 2 :– पर्यावरण स्थितीदर्शक अहवाल वर्ष 2016–17 तयार करणे

| | |
|---|---|
| (दुय्यम माहितीचे आधारे) | रु. 20.00 लक्ष |
| पर्यावरण स्थितीदर्शक अहवाल वर्ष 2017—18 तयार करणे (दुय्यम माहितीचे आधारे) | रु. 20.00 लक्ष |
| पर्यावरण स्थितीदर्शक अहवाल वर्ष 2018—19 तयार करणे (दुय्यम माहितीचे आधारे) | रु. 22.00 लक्ष |
| पर्यावरण स्थितीदर्शक अहवाल वर्ष 2019—20 तयार करणे (दुय्यम माहितीचे आधारे) | रु. 24.00 लक्ष |
| पर्यावरण स्थितीदर्शक अहवाल वर्ष 2020—21 तयार करणे (दुय्यम माहितीचे आधारे) | रु. 24.00 लक्ष |
| | रु. 110.00 लक्ष |
| अधिक सेवाकर (15 टक्के * 110.00 लक्ष) | रु. 16.50 लक्ष |
| | रु. 126.50 लक्ष |

सेवाकर त्यावेळी असणारे दरानुसार म.न.पा. ला द्यावा लागेल.

क्रिया 3 :— सहभाग व स्मार्ट सिटी करिता मनपास सहाय्य करणे.

उपरोक्त प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 558:— {उद्यान विभाग} प्रभाग क्र. 40, गांधीबाग उद्यानात "राष्ट्रीय संत तुकडोजी महाराज स्मारक" तयार करण्यास्तव विविध कामे करण्याचे एकत्रित कामाचे रू 39,50,000/— ( अक्षरी एकोणचाळीस लक्ष पंनास हजार फक्त) रक्कमेच्या कामास स्थायी समिती ठराव क्र. 142/दि. 13/05/2016 अन्वये प्रशासकिय मान्यता प्रदान करण्यात आली असून त्या अनुषंगाने निविदा मागविल्या असता प्राप्त तिन निविदापैकी निम्मतम निविदा मे. जीतू कन्स्ट्रक्शन यांची 1.00 % कमी दराची रू. 37,74,742/— रक्कमेची निम्मतम निविदेस मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 559:— {लोककर्म झोन 02} प्रभाग क्र. 53 अ+ब अंतर्गत बाजी प्रभु नगर आणी राम नगर जवळील रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामास्तव प्राप्त निविदापैकी में. एस. के. गुरूबक्षाणी हयांची मुळ प्राकलनीय दराची निविदा रूपये 29,97,263/—( रूपये एकोणतीस लक्ष सत्यानऊ हजार दोन शे त्र्येसष्ट रूपये फक्त ) स्विकृत करण्याचा प्रश्न विचारात घेणे हे काम पद क्रमांक 682(Fix.Pro.) (A22001330803) अंतर्गत प्रस्तावित आहे. तरतुद मुक्त करण्याच्या मंजुरीचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 560:— {लोककर्म झोन 05} मौजा—नरसाळा येथील विविध भागामध्ये पावसाळी पाण्याचा योग्य निचरा होण्याकरीता आर.सी.सी. NP-II 450mm dia पाईपचे रोड क्रॉसिंगचे काम करण्यास्तव रू. २६,६६,१२५/— च्या प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याच्या प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 561:— {लोककर्म झोन 10} प्रभाग क्र. २३ अ व ब मधील विविध रस्त्यांचे डांबरीकरण करण्यास्तव रू. २९,९९,६७३/— ( एकोणतीस लक्ष नव्यानऊ हजार नऊशे सहाशे त्र्याहत्तर रू. फक्त ) च्या प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 562</u>:— {लोककर्म झोन 10} प्रभाग क्र. ७ अ व ब मध्ये विविध ठिकाणी झिंगाबाई टाकळी येथे झेंडा चौक ते शफीनगर, गायत्रीनगर, संत ज्ञानेश्वर सोसायटी, जय दुर्गा सोसायटी, बंधुनगर येथील रोडचे डांबरीकरण मध्ये रू. २९,९८,०२६/—( एकोणतीस लक्ष अठ्ठयानऊ हजार सविस रू. फक्त) च्या प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 563</u>:— {लोककर्म झोन 10} प्रभाग क्र. १० अ व ब मधील नईवस्ती मंगळवारी, ख्रिश्चन कॉलनी व बेझनबाग भागात रस्त्यांचे डांबरीकरणाचे कामास्तव रू. २९,९९,९६९/— ( एकोणतीस लक्ष नव्यानऊ हजार नऊशे एकोणसत्तर रू. फक्त) च्या प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 564</u>:— {क्रिडा व सां. विभाग} नागपूर महानगरपालिकेतर्फे अखिल भारतीय खो—खो महासंघाचे सहकार्याने "५० वी वरिष्ठ नॅशनल महापौर चषक खो—खो स्पर्धेचे" आयोजन दि. १९ ऑक्टोबर ते २३ ऑक्टोबर २०१६ या कालावधीत "यशंवत स्टेडियम" धंतोली येथील मैदानावर आयोजित आहे. स्पर्धेच्या दृष्टीकोनातून आवेदन, निविदा प्रक्रिया करण्याची तथा या स्पर्धेकरीता प्राकलन नुसार रू. ५९,५३,१४०/— खर्च अपेक्षित आहे. कृपया यास प्रशासकीय तथा वित्तिय मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 565</u>:— {प्रवर्तन विभाग} प्रवर्तन विभागासाठी 01 नग एस्कॅव्हेटर लोडर खरेदीस्तव आर्थिक वर्ष 2015—2016 अंतर्गत रू. 28.00 लक्ष रूपयाचे प्रावधान प्रवर्तन विभागाचे पद क्र. A21200930801 मधुन देण्यात आले होते. सदर एस्कॅव्हेटर लोडर खरेदीस्तव विभागातर्फे 2015—2016 या आर्थिक वर्षात दि. 21/03/2016 ला मे. महेन्द्रा ॲन्ड महेन्द्रा कंपनीला कारखाना विभागातर्फे कार्यादेश देण्यात आला असून कार्यादेशाच्या अनुषंगाने विभागाला महेन्द्रा ॲन्ड महेन्द्रा कंपनीकडून सदर मशिन आर्थिक वर्ष 2016—2017 दि. 06/05/2016 रोजी प्राप्त झाल्यामुळे सदर मशिनसाठी महेन्द्रा ॲन्ड महेन्द्रा कंपनीचे देयक क्रमांक 742719 रू. 20,81,240/— चे भुगतान आर्थिक वर्ष 2016—2017 मध्ये करावे लागणार आहे.

प्रवर्तन विभागाचे पद क्र. A21200930801 मध्ये 2016—2017 या आर्थिक वर्षात कपात करण्यात आल्यामुळे सदर पदा अंतर्गत या वित्तीय वर्षात 30.00 लक्ष ऐवजी फक्त 15.00 लक्ष प्रावधान उपलब्ध आहे. त्यामुळे उपरोक्त देयक पारीत करण्यास्तव रू. 5,81,240/— प्रवर्तन विभागाचे पद क्र. A21200922004 (किरकोळ खर्च) मधुन पद क्र. A21200930801 मध्ये वळते करावे लागणार आहे.

करीता प्रवर्तन विभागाचे पद क्र. A21200922004 (किरकोळ खर्च) मधुन प्रवर्तन विभागाचे पद क्र. A21200930801 मध्ये रू. 5,81,240/— वळते करण्याच्या प्रस्ताव मंजुर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक 566</u>:—** प्रभाग क्र. 37 अ व ब पडोळे नगर व हिवरी ले आऊट येथे 1) **{लोककर्म झोन 8}** शंकर मेश्राम ते वाठोडा रोड 2) एम. आय. जी. कॉलनी ते लोहाना भवन 3) श्री. चव्हान ते श्री नाकाडे व 4) श्री. तांबेकर ते श्री. काळे यांचे घरापर्यंत रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामास्तव प्राप्त निविदाकार मे. पी.के. नगरारे यांची प्राकलनीय दरापेक्षा 0.10 टक्के कमी दराची रू. 29,95,097/— राशीची निम्नतम निविदा मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

या कामाचा खर्च पद क्र. 682 (A22001330803) अंतर्गत प्रस्तावित आहे.

**<u>ठराव क्रमांक 567</u>:—** प्रभाग क्र. 50, येथील तुलसीदास ते पीसे सभागृह ते नाग **{कार्य.अभि. प्रकल्प}** नदी , जातटरोडी टिंम्बर मार्केट येथील नाल्यांचे बांधकाम करण्याच्या रू. 3,18,62,974/— रकमेच्या शासकिय (मुख्यमंत्री निधी) विशेष निधी अंतर्गत करावयाच्या कामास्तव प्राप्त निविदांपैकी निम्नत्तम निविदाकार मे/हितेश कंस्ट्रक्शन यांची प्राकलनीय दरावरील निम्नत्तम निविदा मंजुर करण्याच्या प्रश्न समितीने विचारात घेऊन प्रस्तावित नाल्याचे बांधकामाची जागा काही अंशी रेल्वेच्या अखत्यारित येत असल्यामुळे विभागाने सक्षम विभागाचे ना—हरकत प्रमाणपत्र प्राप्त करुन घ्यावे तसेच योग्य सल्लागारामार्फत या कामाचे सर्वेक्षण करुन काम करुन घेणे आवश्यक राहिल या सुचनेसह विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक 568</u>:—** प्रभाग क्र. ६४ ब महालक्ष्मीनगर नं. १,२,३ **{लोककर्म झोन 03}** लाडीकर ले—आऊट येथे सी.सी.फ्लोरींग सिमेंटीकरणाचे काम करण्याच्या कामास्तव प्रापत निविदापैकी मे. विश्वदीप इंटरप्रायजेस यांची १४.०० टक्के कमी दराची रु. ४२,९८,९२६/— ची निविदा मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक 569</u>:—** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४८ अन्वये **{सचिवालय}** नगरपालिका सचिवाचे अधिकार व कर्तव्ये निश्चित केले आहे.

अधिनियमातील कलम ४८ (क)(ड) अन्वये नगर सचिव हा स्थायी समिती वेळोवेळी जे निदेश देईल त्यांच्या अधीन, प्रत्यक्ष त्यांच्या हाताखाली काम करणाऱ्या अधिकाऱ्यांची व कर्मचाऱ्यांची कर्तव्ये विहित करेल आणि उक्त अधिकाऱ्यांच्या व कर्मचाऱ्यांच्या कृतीवर, कामांवर, पर्यवेक्षण व नियंत्रण ठेवेल आणि उक्त अधिकाऱ्यांची व कर्मचाऱ्यांची सेवा, पारिश्रमिक व विशेषाधिकार या संबंधीचा सर्व प्रश्नांचा निकाल करेल.

अधिनियमातील कलम ५६ (ड) अन्वये पोट कलम (२) खंड (अ),(ब),(क),(ड) व (ई) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या शास्ती पैकी कोणतीही शास्ती लादता येईल अशी तरतूद आहे. या शास्ती वर अपीलिय प्राधिकरण स्थायी समिती आहे.

अधिनियमातील कलम ५३ (२) अन्वये नगरपालिका सचिव यांच्या प्रत्यक्ष नियंत्रणा खालील नगरपालिका अधिकारी व कर्मचारी मग ते तात्पुरते असे किंवा कायम असो याची नेमणूक करण्याचा अधिकार कोणत्याही बाबतीत स्थायी समितीची मान्यता मिळवण्याचा अधीन नगरपालिका सचिव यांच्याकडे निहित असेल अशी तरतूद आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ५१(१) अन्वये स्थायी समिती अनुक्रमे नगरपालिका मुख्य लेखापरीक्षक व नगरपालिका सचिव यांच्या प्रत्यक्ष हाताखाली नेमावयाचे अधिकारी, लिपीक व कर्मचारी यांची संख्या, पदनाम, श्रेणी, वेतन फी व भत्ते स्थायी समिती पोट कलम (४) च्या तरतूदी अधीन वेळोवेळी ठरवतील अशी तरतूद आहे.

उपरोक्त तरतूदीच्या अनुषंगाने महापालिका सचिवालय करीता अधिकारी व कर्मचारी यांचे पदनाम, पदसंख्या, संवर्ग व वेतनश्रेणी (आस्थापना सूची आकृतीबंद) खालील प्रमाणे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ५१ (३) प्रमाणे फेरबदल करुन समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

| अ.क्र. | प्रस्तावित पदनाम | मंजूर पदसंख्या | मा. आयुक्तांनी प्रस्तावित केलेली पदे | स्थायी समिती द्वारा एमएमसी ॲक्ट प्रमाणे कलम 51 (3) प्रमाणे फेरबदलासह प्रस्तावित | एकूण पदे | वेतनश्रेणी | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. | नगरसचिव | 1 | 0 | 0 | 1 | 15600-39100 GP 5400 | |
| 2. | रिपोर्टर्स / Steno | 4 | 3 | 0 | 7 | 9300-34800 GP 4600 | |
| 3. | उपनगर सचिव | 0 | 1 | 0 | 1 | 9300-34800 GP 4400 | |
| 4. | विशेष कार्य अधिकारी (O.S.D.) | 0 | 0 | 2 | 2 | 9300-34800 GP 4300<br>9300-34800 GP 4400 | |
| 5. | सहा. अधिक्षक | 1 | 0 | 2 | 3 | 9300-34800 GP 4300 | |
| 6. | महापौर, निजी सहाय्यक (मा. महापौर, उपमहापौर, सभापती स्थायी समिती) | 3 | 2 | 0 | 5 | 9300-34800 GP 4300 | |
| 7. | जेष्ठ श्रेणी लिपिक | 2 | 2 | 4 | 8 | 9300-34800 GP 4200 | |
| 8. | उच्चश्रेणी लिपिक | 2 | 2 | 4 | 8 | 5200-20200 GP 2400 | |
| 9. | स्टेनो टायपिस्ट (लघुटंकलेखक) (इंग्रजी व मराठी) | 0 | 2 | 11 | 13 | 5200-20200 GP 2400 | |
| 10. | निम्न श्रेणी लिपिक / टंक लिपिक (संगणक चालक) | 7 | 13 | 6 | 26 | 5200-20200 GP 1900<br>किंवा<br>5200-20200 GP 2000 | |
| 11. | वाहनचालक | 0 | 0 | 6 | 6 | 5200-20200 GP 1900 | |
| 12. | शिपाई / चपराशी | 13 | 20 | 0 | 33 | 4440-7440 GP 1800 | |
| | एकूण | 33 | 45 | 35 | 113 | | |

तसेच भरतीचा प्रकार पदोन्नती/सरळ सेवा व शैक्षणिक पात्रता संलग्न परिशिष्ट 'अ' मध्ये सुध्दा महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ५१ (३) प्रमाणे फेरबदल करुन समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

स्थायी समिती ने केलेल्या फेरबदला नुसार उपरोक्त विषयाचे

-- परिशिष्ट ''अ'' --

# नागपूर शहर महानरगपालिका, नागपूर

अधिकारी व कर्मचारी पदनाम, पदसंख्या, संवर्ग व वेतनश्रेणी दर्शक विविरणपत्र

(आस्थापना सूची)

विभाग :- महापालिका सचिवालय

| अ. क्र. | पदाचे नांव | वेतनश्रेणी | म.न.पा. ठराव क्र. ३१ दि. १२/०४/१९७६ व वेळोवेळी करण्यात आलेल्या ठरावानुसार तरतुदी | भरतीचा प्रकार | | | | मंजूर पद संख्या | नवीन प्रस्तावित पद संख्या | कमी करण्यात आलेली पदे | स्थायी समिती द्वारा एमएमसी ॲक्ट प्रमाणे कलम ५१ (३) प्रमाणे फेरबदला सह प्रस्तावित | एकुण अंतीम पदे | भरती/पदोन्नतीची प्रक्रिया/नियम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | पदोन्नती | | सरळसेवा | | | | | | | |
| | | | | शैक्षणिक पात्राता | प्रमाण | शैक्षणिक पात्राता | प्रमाण | | | | | | |
| १ | नगर सचिव | पी. बी. ३<br>१५६००-३९१००<br>ग्रेड पे. ५४०० | अधिक्षक या संवर्गातुन पदोन्नतीने (जेष्ठता व योग्यतेने.) | १) मान्यताप्राप्त विद्यापिठाची पदवी<br>२) स्थानिक स्वराज्य संस्थेची एल.एस.जी. डी. परिक्षा उत्तीर्ण किंवा एम.ए. पब्लीक ॲडमिनिस्ट्रेशन द्वितीय श्रेणी पदवी उत्तीर्ण. | १०० टक्के | - | - | ०१ | ० | ० | | ०१ | १) नगर सचिव पद महानगरपालिकेतील अधिक्षक व उप नगर सचिव या संवर्गातून पदोन्नतीने भरावे<br>- नगर सचिव पद भरण्यासाठी प्रशासनाने अधिक्षक व उप नगर सचिव संवर्गातील पदोन्नतीकरीता पात्रा अधिकाऱ्यांची यादी नावासह महानगरपालिकेला सादर करावी आणि महानगरपालिका यातून योग्य व्यक्तीची नगर सचिव पदावर नियुक्ती करेल.<br>२) अनुभव :- अधिक्षक व उपनगर सचिव या संवर्गातील ५ वर्षाचा अनुभव |
| २ | रिपोटर्स Steno (समिती विभाग ) | पी. बी. २<br>९३००-३४८००<br>ग्रेड पे. ४६०० | १) ग्रॅज्युेट पास, पदवीधारक<br>२) हिंदी किंवा मराठी आशुलिपीकाची कमीत-कमी १२० प्रति शब्द मिनीटाची परिक्षा पास | - | - | १) मान्यता प्राप्त विद्यापिठाची पदवी<br>२) शासनाची हिंदी किंवा मराठी आशुलिपीकाची १२० शब्द प्रती मिनीट परिक्षा उत्तीर्ण.<br>३) शासनाची मराठी टंकलेखनाची ४० शप्रमि. परिक्षा उत्तीर्ण.<br>अनुभव :-रिपोर्टर कामाचा ३ वर्षाचा अनुभव. | १०० | ०४ | ०३ | ० | | ०७ | १) जाहिरातीद्वारे पदभरती प्रक्रिया<br>२) अनुभव :- रिपार्टर कामाचा तीन वर्षाचा अनुभव. |
| ३ | उप नगर सचिव | पी. बी. २<br>९३००-३४८००<br>ग्रेड पे. ४४०० | पद नव्हते. | १) मान्यताप्राप्त विद्यापिठाची पदवी<br>२) स्थानिक स्वराज्य संस्थेची एल.एस.जी. | १०० टक्के | | | ० | ०१ | ० | | ०१ | १) उप नगर सचिव पद महापौर यांचे निजी सहाय्यक, उप महापौर यांचे निजी सहाय्यक, मा. अध्यक्ष, स्थायी |

| अ. क्र | पदाचे नांव | वेतनश्रेणी | म.न.पा. ठराव क्र. ३१ दि. १२/०४/१९७६ व वेळोवेळी करण्यात आलेल्या ठरावानुसार तरतुदी | भरतीचा प्रकार | | | | मंजूर पद संख्या | नवीन प्रस्तावित पद संख्या | कमी करण्यात आलेली पदे | स्थायी समिती द्वारा एमएमसी ॲक्ट प्रमाणे कलम ५१ (३) प्रमाणे फेरबदला सह प्रस्तावित | एकुण अंतीम पदे | भरती/पदोन्नतीची प्रक्रिया/नियम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | पदोन्नती | | सरळसेवा | | | | | | | |
| | | | | शैक्षणिक पात्राता | प्रमाण | शैक्षणिक पात्राता | प्रमाण | | | | | | |
| | | | | डी. परिक्षा उत्तीर्ण | | | | | | | | | समिती यांचे निजी सहाय्यक या संवर्गातून पदोन्नती भरावे<br>२) अनुभव :-सहा. अधिक्षक ,या पदाचा समिती विभागातील प्रशासकीय कामाचा ५ वर्षाचा अनुभव, |
| ४ | विशेष कार्य अधिकारी (O.S.D.) | पी. बी. २<br>९३००-३४८००<br>ग्रेड पे. ४३००<br>पी. बी. २<br>९३००-३४८००<br>ग्रेड पे. ४४०० | पद नव्हते | | | मनपा च्या विभागीय अधिकाऱ्यांनमधून स्था.अ.स. / कनिष्ठ अभियंता / शाखा अभियंता / उप अभियंता (तांत्रिक संवर्गातून) या पदामधुन प्रतिनियुक्ती द्वारे. | | ० | ० | ० | २ | ०२ | मनपा च्या विभागीय अधिकाऱ्यांनमधून स्था.अ.स. / कनिष्ठ अभियंता / शाखा अभियंता / उप अभियंता (तांत्रिक संवर्गातून) या पदामधुन प्रतिनियुक्ती द्वारे. या संवर्गातील १२ वर्षाचा अनुभव. |
| ५ | सहाय्यक अधिक्षक | पी. बी. २<br>९३००-३४८००<br>ग्रेड पे. ४३०० | म.न.पा. ठराव क्र. ६१ दि. ३१/०७/१९९५ नुसार राजस्व निरीक्षक व जेष्ठ श्रेणी लिपीक यांची संयुक्त सेवाजेष्ठता यादीमधुन जेष्ठता व योग्यता या तत्वावर पदोन्नतीने भरण्यात येतील. | १) मान्यताप्राप्त विद्यापिठाची पदवी. | १०० टक्के | | | ०१ | ० | ० | २ | ०३ | १) सहाय्यक अधिक्षक पद जेष्ठ श्रेणी लिपीक संवर्गातून पदोन्नतीने भरावे<br>२)अनुभव :-जेष्ठ श्रेणी लिपीक संवर्गातील कामाचा ३ वर्षाचा अनुभव. |
| ६ | निजी सहाय्यक (मा. महापौर, उपमहापौर, सभापती स्थायी समिती) | पी. बी. २<br>९३००-३४८००<br>ग्रेड पे. ४३०० | मॅट्रीक, मराठी किंवा हिंदी शॉर्टहॅन्ड १०० शब्द प्रति. मिनीट परिक्षा पास यासोबत इंग्रजी शॉर्टहॅन्डची परिक्षा पास व या कामाचा अनुभव असणा-यास प्राधान्य. | १) मान्यताप्राप्त विद्यापिठाची पदवी.<br>२) लघुलेखक ८० प्र. मि. शब्द व टंकलेखक (इंग्रजी व मराठी ) परिक्षा उत्तीर्ण | १०० टक्के | | | ०३ | ०२ | ० | | ०५<br>महापौर -२<br>सत्तापक्ष-१<br>विरोधी पक्ष नेते -१<br>परिवहन समिती-१ | १) निजी सहाय्यक पद उच्च श्रेणी लिपीक संवर्गातून पदोन्नतीने भरावे<br>२)अनुभव :-उच्च श्रेणी लिपीक संवर्गातील कामाचा ३ वर्षाचा अनुभव. |
| ७ | जेष्ठ श्रेणी लिपीक | पी. बी. २<br>९३००-३४८००<br>ग्रेड पे. ४२०० | कनिष्ठ निरीक्षक व उच्च श्रेणी लिपीक यांची संयुक्त सेवाजेष्ठता यादीमधुन जेष्ठता व योग्यता या तत्वावर पदोन्नतीने भरण्यात येतील. | १) मान्यता प्राप्त विद्यापिठाची पदवी.<br>२) स्थानिक स्वराज संस्थेची एल.एस.जीडी. परिक्षा उत्तीर्ण<br>३) स्थानिक स्वराज संस्थेची आस्थापना व लेखा परिक्षणाचे २ महिन्याचे प्रशिक्षण. | १०० टक्के | | | ०२ | ०२ | ४ | ८ | ०८<br>महापौर कार्यालय-१<br>परिवहन कार्यालय-१<br>विषेष समिती -१<br>प्रभाग समिती-१<br>सचिवालय-४ | १) जेष्ठ श्रेणी लिपीक पद उच्च श्रेणी लिपीक संवर्गातून पदोन्नतीने भरावे<br>२) अनुभव :- उच्च श्रेणी लिपीक पदावरील ३ वर्षाचा अनुभव. |
| ८ | उच्च श्रेणी लिपीक | पी. बी. १<br>५२००-२०२००<br>ग्रेड पे. २४०० | कनिष्ठ लिपीक, कॉम्पूटर क्लर्क, टेलिफोन क्लर्क, | मान्यता प्राप्त विद्यापिठाची पदवी. | १०० टक्के | | | ०२ | ०२ | ०४ | ८ | ०८ | १) निकट निम्नतम श्रेणीतील कनिष्ठ लिपीक, प्रयोग शाळा सहाय्यक, टेलिफोन ऑपरेटर |

| अ. क्र | पदाचे नांव | वेतनश्रेणी | म.न.पा. ठराव क्र. ३१ दि. १२/०४/१९७६ व वेळोवेळी करण्यात आलेल्या ठरावानुसार तरतुदी | भरतीचा प्रकार | | | | मंजूर पद संख्या | नवीन प्रस्तावित पद संख्या | कमी करण्यात आलेली पदे | स्थायी समिती द्वारा एमएमसी ॲक्ट प्रमाणे कलम ५१ (३) प्रमाणे फेरबदला सह प्रस्तावित | एकुण अंतीम पदे | भरती/पदोन्नतीची प्रक्रिया/नियम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | पदोन्नती | | सरळसेवा | | | | | | | |
| | | | | शैक्षणिक पात्राता | प्रमाण | शैक्षणिक पात्राता | प्रमाण | | | | | | |
| | | | प्रयोगशाळा सहाय्यक यांच्या संयुक्त सेवाजेष्ठता यादीमधुन जेष्ठता व योग्यता या तत्वावर पदोन्नतीने भरण्यात येतील. | | | | | | | | | | रजिस्टार बर्थ ॲन्ड डेथ यांच्या संयुक्त सेवाजेष्ठता यादीतुन कर्मचा-यातुन योग्यता व जेष्ठता या तत्वावर पदोन्नतीद्वारे भरण्यांत येईल<br>२) अनुभव :-प्रशासकीय कामाचा ३ वर्षाचा अनुभव. या पदाच्या कनिष्ठ संवर्गातील काम करण्याचा ३ वर्षाचा अनुभव |
| ९ | अ) स्टेनो टायपिस्ट (लघुटंक लेखक) | पी. बी. १<br>५२००-२०२००<br>ग्रेड पे. २४०० | १) मॅट्रीक पास,<br>२) आशुलिपीक मराठी कमीत-कमी १०० प्रतिशब्द परिक्षा उत्तीर्ण | | | १) मान्यता प्राप्त विद्यापिठाची पदवी<br>२) शासनाची मराठी लघुलेखक ८०श.प्र. मि. परिक्षा उत्तीर्ण<br>३) इंग्रजी लघुलेखक ८०श.प्र.मि. परिक्षा उत्तीर्ण<br>४) शासनाची मराठी ४० आणि इंग्रजी ४० श.प्र.मि. वेगाची टंकलेखनाची परिक्षा उत्तीर्ण. | १०० टक्के | ०० | ०२ | ० | ११ | १३<br>अपर आयुक्त-३<br>उपायुक्त-३<br>अधिक्षक अभियंता-२<br>सहा. आयुक्त-१<br>(उपरोक्त पदे ९ पदे सामान्य प्रशासन विभागाच्या आस्थापनेवर टाकावे.)<br>तसेच सचिवालय विभागाच्या आस्थापनेवर खालील नमुद पदे टाकावे<br>महापौर का. - १,<br>स्थायी समिती कार्यालय -१<br>सचिवालय -०२ | १) सरळ सेवा भरतीने जाहिरातीद्वारे |
| १० | टंक लिपीक/ निम्न श्रेणी लिपीक | पी. बी. १<br>५२००-२०२००<br>ग्रेड पे. १९००<br>किंवा<br>पी. बी. १<br>५२००-२०२००<br>ग्रेड पे. २०००<br>किंवा | १० वा वर्ग पास, मराठीची ३० शब्द प्रति मिनीट किंवा इंग्रजी ४० शब्द प्रतिमिनीट टंकलेखन परिक्षा पास | १) माध्यमिक शालांत परिक्षा (एसएससी) व तत्सम<br>२) शासनाची मराठी टंक लेखन ३० श. प्र. मि. उत्तीर्ण<br>३) महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्रा शिक्षण मंडळ, मुंबई यांचे कडील अधिकृत MSCIT परिक्षा उत्तीर्ण किंवा D.O.E.A.C.C. | ५० टक्के | १) मान्यताप्राप्त विद्यापिठाची पदवी<br>२) शासनाची मराठी टंक लेखन ३० श. प्र. मि. उत्तीर्ण<br>३) महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्रा शिक्षण मंडळ, मुंबई यांचे कडील अधिकृत MSCIT परिक्षा उत्तीर्ण किंवा | ४० टक्के | ०७ | १३ | ०२ | ६ | २६<br>महापौर कार्यालय-०२<br>उपमहापौर कार्यालय-०१<br>मा. सभापती(स्था.स.)-०२<br>परिवहन कार्यालय-०१<br>प्रभाग | १) ५० टक्के पदोन्नतीने भरावयाची पदे निम्नतम श्रेणी मधुन<br>२) ५०टक्के सरळ सेवा भरती जाहिरातीद्वारे |

| अ. क्र | पदाचे नांव | वेतनश्रेणी | म.न.पा. ठराव क्र. ३१ दि. १२/०४/१९७६ व वेळोवेळी करण्यात आलेल्या ठरावानुसार तरतुदी | भरतीचा प्रकार | | | | मंजूर पद संख्या | नवीन प्रस्तावित पद संख्या | कमी करण्यात आलेली पदे | स्थायी समिती द्वारा एमएमसी ॲक्ट प्रमाणे कलम ५१ (३) प्रमाणे फेरबदला सह प्रस्तावित | एकुण अंतीम पदे | भरती/पदोन्नतीची प्रक्रिया/नियम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | पदोन्नती | | सरळसेवा | | | | | | | |
| | | | | शैक्षणिक पात्राता | प्रमाण | शैक्षणिक पात्राता | प्रमाण | | | | | | |
| | | | | सोसायटीच्या अधिकृत C.C.C. किंवा O स्तर किंवा A स्तर किंवा B स्तर, किंवा C स्तर पैकी कोणतीही एक परिक्षा उत्तीर्ण तसेच निम्नतम पदावरी एस.एस.सी नंतरचा किमान ५ वर्षाचा अनुभव | | D.O.E.A.C.C. सोसायटीच्या अधिकृत C.C.C. किंवा O स्तर किंवा A स्तर किंवा B स्तर, किंवा C स्तर पैकी कोणतीही एक परिक्षा उत्तीर्ण अनुकंपाद्वारे | १० टक्के | | | | | समिती-१३ विशेष समिती-०२ सचिवालय -०५ | |
| ११ | वाहनचालक | पी. बी. ३ ५२००-२०२०० ग्रेड पे. १९०० | ८ वा वर्ग उत्तीर्ण व जड वाहन चालविण्याचा प्रादेशिक परिवहन कार्यालयाचा परवाना धारक | | | १० वा वर्ग उत्तीर्ण व जड वाहन चालविण्याचा प्रादेशिक परिवहन कार्यालयाचा परवाना धारक | ० | ० | ० | ० | ६ | ०६ महापौर कार्यालय-०२ उपमहापौर कार्यालय-०१ मा. सभापती(स्था.स.)-०२ परिवहन कार्यालय-०१ | १) सरळ सेवा भरतीने जाहिरातीद्वारे<br>२) अनुभव :- दोन वर्षाचा अनुभव. |
| १२ | शिपाई /चपराशी | पी. बी. १ ४४४०-७४४० ग्रेड पे. १८०० | निम्नतम श्रेणीमधुन जे ८ वा वर्ग पास आहे अश्या कर्मचा-यांमधुन पदोन्नतीद्वारे योग्यता व जेष्ठता या तत्वावर भरण्यात येतील. | | | माध्यमिक शालांत परिक्षा पास (एस.एस.सी) व तत्सम. | १०० टक्के | १३ | २० | ० | | ३३ महापौर कार्यालय -०२ उपमहापौर कार्या.-०१ मा. सभापती (स्थ.स.)-०१ परिवहन-०१ प्रभाग समिती-१३ विशेष समिती-०२ डाक शिपाई/ चपराशी-१३ | १०० टक्के सरळ सेवा भरतीने जाहिरातीद्वारे |
| | | | | एकुण पदे | | | | ३३ | ४५ | ०२ | ३५ | ११३ | |
| | | | | | | अ) स्टेनो टायपिस्ट (लघुटंक लेखक) - | | | | | ९ | | सामान्य प्रशासन विभागाच्या आस्थापनेवर टाकावे |
| | | | | एकुण पदे (सचिवालय) | | | | ३३ | ४५ | ०२ | २६ | १०४ | |

करीता महापालिका सचिवालय आकृतीबंद अधिनियमातील कलम ५१(१) अन्वये स्थायी समितीच्या मान्यते करीता सादर केलेला प्रश्न समितीने विचारात घेवून वरिल परिशिष्टात व प्रस्तावित विषयास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ५१ (३) मधिल तरतुदीनुसार फेरबदल करुन यास एकमताने मंजूरी प्रदान केली, तसेच प्रस्तावित विषय महासभे समक्ष सादर करण्यास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 570</u>:— प्रभाग क्र. 49 अंतर्गत उंटखाना, चंदननगर, हनुमाननगर {लोककर्म झोन 03} येथील सिमेंट कॉंक्रीट व रस्त्याचे डांबरीकरणाचे काम करण्याच्या कामास्तव प्राप्त निविदापैकी मे. डी.सी.गुरुबक्षाणी यांची प्राकलनीय दराची रु. 29,98,597/— ची निविदा मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 571</u>:— प्रभाग क्र. 36 ब मधील वर्धमाननगर आणि पूर्व वर्धमाननगर {लोककर्म झोन 08} येथील रस्त्यांचे डांबरीकरण करण्यास्तव रु. 49,99,945/— रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचा तसेच पद क्र A22001330802 मधून तरतूद मुक्त करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 572</u>:— प्रभाग क. 60—ब अंतर्गत सक्करदरा येथील {लोककर्म झोन 05} सोनझरी परिसरातील रस्त्यांचे रूंदीकरण व डांबरीकरण करण्याच्या कामास्तव रू. ३०,२७,१५७/— च्या प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याच्या प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 573</u>:— प्रभाग क्र. २८ ब मोमीनपूरा, डोबीनगर येथे सी. {लोककर्म झोन 06} सी.पेव्हमेंट करणे व आय ब्लॉक लावण्यासाठी तयार केलेल्या रू. २५,९७,१७३/— रकमेच्या प्राकलनास जूने पद क्र. ६७९ व नविन पद क्र. A42001470511 अंतर्गत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचा तसेच हे काम रितसर निविदा मागवून हाती घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 574</u>:— सिमेंट रस्ते प्रकल्प फेज—2 चे एकुण 22 पॅकेजेसच्या {लोककर्म विभाग} कामा मध्ये Quality Assurance व Quality Control चे कामाकरीता Consultancy Services देण्याकरीता निविदा बोलविण्यात आल्या असता प्राप्त मे. जियोटेक सर्विसेस यांची प्रकल्प राशीच्या (प्रत्यक्षात येणा—या खर्चाचे) 1.05 टक्के financial व technical गुणान्वये सर्वोत्तम असलेली निविदा स्विकारण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

वरील कामाकरीता अंदाजीत रू. 3.15 कोटी खर्च अपेक्षीत आहे. कामाचा खर्च पद क्र. A42001470514 मधुन करण्यात येईल

<u>ठराव क्रमांक 575</u>:— नवीन प्रशासकिय भवनामध्ये तळमजला, दुसरा मजला {कार्य.अभि.एनएबीपी } व तिसरा मजल्याचे अंतर्गत (उर्वरीत कामे) बैठक व्यवस्थेकरीता आवश्यक साजसजावट व स्थापत्य कामे करण्यास्तव एकूण प्राप्त निविदापैकी मे. एस.एस. पाटील ॲन्ड कंपनी यांची मुळ प्राकलनीय दरापेक्षा २.२२ टक्के कमी दराची रू. १,८४,०३,१०१/— राशीची निविदा मंजूर करण्याच्या प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 576</u>:— प्रभाग क्र. 70 येथील गजानन नगर, नेल्को सोसायटी, {कार्य.अभि. (प्रकल्प)} पठान लेआउट, पाटील लेआउट येथे सीवर लाईन टाकण्याच्या रू. 5404448/— रकमेच्या शासकिय (मुख्यमंत्री निधी) विशेष निधी अंतर्गत करावयाच्या कामास्तव प्राप्त निविदांपैकी निम्नत्तम निविदाकार मे. सी. विजय नायडू यांची प्राकलनीय दरापेक्षा 5 टक्के जास्त दराची निम्नत्तम निविदा मंजुर करण्याच्या प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक 577</u>:—** {लोककर्म झोन 07} प्रभाग क्र. 17 (अ) येथील बस्तरवारी मधील लोधीपूरा येथे सिंमेट कॉक्रीट रस्त्यांचे कामास्तव प्राप्त निपिदापैकी मे. उल्हास ऐन्टरप्रायझेस यांची मुळ प्राकलनीय राशी रु. 35,81,236/— पेक्षा 15.25 टक्के कमी दराची रू. 30,35,097/— (रूपये तीस लक्ष पस्तीस हजार सत्यानव) ची निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न तसेच हे काम पद क्र. 681 (A22001330802) अंतर्गत प्रस्तावित असल्याने कामाचा खर्च प्रावधान राशी सीमित ठेवण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक 578</u>:—** {लोककर्म झोन 07} प्रभाग क्र. 14 (अ) अंतर्गत धम्मदिपनगर येथे विविध ठिकाणी सीमेट.कॉक्रीट रस्त्याचे बांधकाम करण्यास्तव प्राप्त निविदापैकी मे. उल्हास एन्टरप्रायझेस यांची मुळ प्राकलनीय राशी रु. 27,44,869/— पेक्षा 16. 1% टक्के कमी दराची रू. 23,02,945/— (रूपये तेवीस लक्ष दोन हजार नऊशे पंचेचाळीस) ची निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक 579</u> :—** आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

निगम सचिव
महानगरपालिका,नागपूर

सभापती
स्थायी समिती,
महानगरपालिका,नागपूर